02 APR 2026

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कागलच्या जैव उद्यानात विद्यापीठातर्फे पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

कागल येथील जैवविविधता उद्यानात शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागातर्फे पक्ष्यांसाठी दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले आहेत. किर्लोस्कर ऑईल इंजिन्स कंपनीच्या सामाजिक बांधिलकी उपक्रमांतर्गत येथील सार्थ एज्यु. सोसायटीतर्फे कागल येथे जैवविविधता उद्यान पुनरुज्जीवन प्रकल्पाचे काम सुरू आहे.

या ठिकाणी शिवाजी विद्यापीठातील हिंदी अधिविभागाच्या वतीने पक्ष्यांसाठी कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार करण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला. तीव्र उन्हाळ्यामुळे पशुपक्ष्यांना पाण्यासाठी वणवण करावी लागते. पक्ष्यांसह छोट्या प्राण्यांसाठी पाण्याची सोय करण्याच्या दृष्टीने सार्थ एज्यु. सोसायटीचे अध्यक्ष डॉ. दिलीप माळी यांनी असा उपक्रम हाती घेण्याचे आवाहन विद्यार्थ्यांना केले होते. त्यानुसार हिंदी अधिविभागातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी उद्यानात श्रमदानातून दोन कृत्रिम पाणवठे (पक्षीतीर्थ) तयार केले. वृक्षप्रेमी संस्थेचे अमोल बुद्धे, यांच्या मार्गदर्शनाखाली पाणवठे तयार करण्यात आले. हिंदी अधिविभागातील डॉ. जयसिंग कांबळे, डॉ. प्रकाश निकम, डॉ. अक्षय भोसले तसेच संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी श्रमदानात सहभाग घेतला.

अमोल बुद्धे यांनी उपस्थितांना पक्ष्यांसाठी तयार घरटी वाटप केली व त्यांचे महत्त्व समजून सांगितले. यावेळी डॉ. दिलीप माळी यांनी जैवविविधता उद्यानाच्या पुनरुज्जीवनाचा उद्देश, प्रकल्पाचे भविष्यातील नियोजन, सामाजिक महत्त्व तसेच जैवविविधतेची गरज याबद्दल माहिती दिली. हिंदी अधिविभागप्रमुख डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी प्रास्ताविक करून आभार मानले.



कोल्हापूर : कागलच्या जैवविविधता उद्यानात श्रमदानातून तयार केलेल्या पक्षीतीर्थाशेजारी डॉ. तृप्ती करेकट्टी यांच्यासह विद्यार्थी-विद्यार्थिनी.




वार्ता सम्राट

संपादक : प्रकाश कांबळे (लिंगनूरकर)

Postal Reg.No.KLP-346/2026-2028 RNI No.MAHMAR/2016/72710 email :vartasamrat@gmail.com

* वर्ष १० वे * अंक १८ वा * गुरूवार दि.२ एप्रिल २०२६ * पृष्ठ ४ * किंमत ५ रूपये *

जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धांचे शिवाजी विद्यापीठामार्फत सांगली येथे आयोजन

## महाराष्ट्रात प्रथमच होणार राष्ट्रीय स्पर्धा; देशभरातील ४० विद्यापीठांमधील ६८५ क्रीडापटूंचा सहभाग

कोल्हापूर/प्रतिनिधी : भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. ५ ते बुधवार दि. ८ एप्रिल या कालावधीत सांगली येथे कृष्णा नदीमध्ये या स्पर्धा आयोजित करण्यात आल्या आहेत.ही स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच होत असल्याने शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार असल्याचे शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी पत्रकार परिषदेत बोलतांना स्पष्ट केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेस ऑनलाईन संबोधित करताना ते बोलत होते.

स्पर्धेचे उद्घाटन रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सांगली येथील कै. वसंतदादा पाटील स्मारक कृष्णा नदी घाट येथे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते व प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे हे उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर सन्माननीय अतिथी म्हणून सांगलीचे जिल्हाधिकारी मैनक घोष, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सांगलीचे आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, सांगलीचे महापौर धीरज सूर्यवंशी आणि स्पर्धा निरीक्षक यांचीही यावेळी उपस्थिती असणार आहे.

यावेळी बोलतांना कुलगुरू डॉ. गोसावी यांनी या स्पर्धा सांगली येथील कै.वसंत दादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे होणार आहेत. या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होतील. खेळाडू प्रशिक्षक व पंच यांची निवास व्यवस्था मिशन हॉस्पिटल मिरज येथील विद्यार्थी विद्यार्थिनी वसतीगृहामध्ये केली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पंचांची निवास व्यवस्था मिशन हॉस्पिटलच्या गेस्ट हाऊस येथे करण्यात आली आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील नौकानयनातील उदयोन्मुख खेळाडू व क्रीडाप्रेमी यांना सदर स्पर्धा पाहण्याची मोठी संधी प्राप्त झाली असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागाचा अनुभव व वातावरण निर्मितीच्या दृष्टीने विद्यापीठाच्या वतीने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले की, प्रत्यक्ष स्पर्धा ५ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता सुरू होतील. स्पर्धेत कयाकिंग मध्ये १, २, ४ तसेच कनोईंग मध्ये १, २ असे २०० मी. ५०० मी. व १००० मी. या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ८ एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजता होणार असून यामध्ये यशस्वी खेळाडूंना मेडल व सांघिक विजेता, उपविजेता व तृतीय क्रमांक यांना चषक देऊन गौरवण्यात येणार आहे. तरी, सदर स्पर्धेचा लाभ सांगली सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी खेळाडू यांनी घ्यावा, असे आवाहनही डॉ. बनसोडे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी संचालक डॉ. कबीर खराडे, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 APR 2026
पुढारी

# शिवाजी विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनोईंग, कयाकिंग स्पर्धा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कॅनोईंग व कयाकिंग स्पर्धा सांगली येथे ५ एप्रिलपासून आयोजित करण्यात आली आहे. महाराष्ट्रात प्रथमच या स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याची माहिती समिती अध्यक्ष प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दिली.

सांगली येथील कै. वसंतदादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे पुरुष आणि महिला अशा दोन गटांत ही स्पर्धा होणार आहे. स्पर्धेसाठी देशातील ४० विद्यापीठातील ६८५ खेळांडू सहभागी होणार आहेत. कोल्हापूर, सांगली, सातारा, जिल्ह्यांतील नौकानयनमधील उदयोन्मुख खेळाडू व क्रीडाप्रेमींना स्पर्धा पाहण्याची संधी मिळणार आहे. कयाकिंगमध्ये के १, के २, के ४ आणि कॅनोईंगमध्ये सी १, सी २ असे २०० मीटर, ५०० मीटर आणि एक हजार मीटर या क्रीडा प्रकारांत स्पर्धा होणार आहे.

दैनिक माणदेशी बुलंद आवाज...
# माणदेश एक्सप्रेस
• गुरुवार दि २ एप्रिल २०२६ •

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग स्पर्धांचे आयोजन

## शिवाजी विद्यापीठामार्फत सांगली येथे आयोजन
## महाराष्ट्रात प्रथमच होणार राष्ट्रीय स्पर्धा
## देशभरातील ४० विद्यापीठांमधील ६८५ क्रीडापटूंचा सहभाग





**माणदेश एक्सप्रेस न्युज**

**कोल्हापूर : भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.)आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार दि. ५ एप्रिल ते बुधवार दि. ८ एप्रिल या कालावधीत सांगली येथे कृष्णा नदीमध्ये या स्पर्धा होतील. सदर स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच आयोजित केल्या जात असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे. ही माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी आज दिली. शिवाजी विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेस ऑनलाईन संबोधित करताना ते बोलत होते.**

कुलगुरू डॉ. गोसावी यांनी दिलेल्या माहितीनुसार, सदर स्पर्धा सांगली येथील कै. वसंतदादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदी घाट येथील रॉयल बोट क्लब येथे होणार आहेत. या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होतील. खेळाडू प्रशिक्षक व पंच यांची निवास व्यवस्था मिशन हॉस्पिटल मिरज येथील विद्यार्थी विद्यार्थिनी वसतीगृहामध्ये केली आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पंचांची निवास व्यवस्था मिशन हॉस्पिटलच्या गेस्ट हाऊस येथे करण्यात आली आहे. कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांतील नौकानयनातील उदयोन्मुख खेळाडू व क्रीडाप्रेमी यांना सदर स्पर्धा पाहण्याची मोठी संधी प्राप्त झाली असून राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये सहभागाचा अनुभव व वातावरण निर्मितीच्या दृष्टीने विद्यापीठाच्या वतीने सदर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे यांनी सांगितले की, स्पर्धेचे उद्घाटन रविवार दिनांक ५ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सांगली येथील कै. वसंतदादा पाटील स्मारक कृष्णा नदी घाट येथे राज्याचे उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत दादा पाटील यांच्या हस्ते व प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे हे उपस्थित राहणार आहेत. त्याचबरोबर सन्माननीय अतिथी म्हणून सांगलीचे जिल्हाधिकारी मैनक घोष, सांगली-मिरज-कुपवाड महानगरपालिकेचे आयुक्त सत्यम गांधी, प्रभारी प्रा. कुलगुरू डॉ. ज्योती जाधव कुलसचिव डॉ. विलास शिंदे, सांगलीचे आमदार धनंजय उर्फ सुधीर गाडगीळ, सांगलीचे महापौर धीरज सूर्यवंशी आणि स्पर्धा निरीक्षक यांचीही यावेळी उपस्थिती असेल.

प्रत्यक्ष स्पर्धा ५ एप्रिल रोजी सकाळी सात वाजता सुरू होतील. स्पर्धेत कयाकिंग मध्ये K1, K2, K4 तसेच कनोईंग मध्ये C1, C2 असे २०० मी. ५०० मी. व १००० मी. या जलक्रीडा प्रकारात स्पर्धा होणार आहेत. स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ ८ एप्रिल रोजी सायंकाळी चार वाजता होणार असून यामध्ये यशस्वी खेळाडूंना मेडल व सांघिक विजेता, उपविजेता व तृतीय क्रमांक यांना चषक देऊन गौरवण्यात येणार आहे. तरी, सदर स्पर्धेचा लाभ सांगली सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील क्रीडाप्रेमी खेळाडू यांनी घ्यावा, असे आवाहनही डॉ. बनसोडे यांनी केले आहे.

या पत्रकार परिषदेला कुलसचिव डॉ. विलास शिंदे, आजीवन अध्ययन केंद्राचे संचालक डॉ. रामचंद्र पवार, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर, राष्ट्रीय सेवा योजनेचे प्रभारी संचालक डॉ. कबीर खराडे, उपकुलसचिव विलास सोयम उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 APR 2026
जनप्रवास

# राज्यात प्रथमच आंतर विद्यापीठ कनोईंग, कयाकिंगच्या स्पर्धा

**कोल्हापूर :** भारतीय विद्यापीठे महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतर विद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार ५ एप्रिल ते बुधवार ८ एप्रिल या कालावधीत सांगली येथे कृष्णा नदीमध्ये या स्पर्धा होतील. या स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच आयोजित केल्या जात असून त्यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे, ही माहिती शिवाजी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दिली. शिवाजी विद्यापीठात आयोजित पत्रकार परिषदेस ऑनलाईन संबोधित करताना ते बोलत होते.

या स्पर्धेत देशभरातील ४० विद्यापीठांमधून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होतील. खेळाडू प्रशिक्षक व पंच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पंचांची निवास व्यवस्था करण्यात आली आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2026

महा न्यूज & व्ह्यूज

वामाक्षी BOUTIQUE
Hanuman Nagar, ITI-Pachgaon road,
Front of Nirmiti Corner Appartment, Kolhapur.
Mob.- 9175089609

# प्रतिभा साधनेने विकसित होते : मृदगंधा दीक्षित

**कोल्हापूर (महान्यूज अँड व्ह्यूज) :**

लेखनकलेकडे वळायचे झाले तर उपजत प्रतिभेला लेखनाविषयीचा ध्यास, शिस्त आणि साधनेची जोड महत्त्वाची असते, असे प्रतिपादन युवा लेखिका मृदगंधा दीक्षित यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या मराठी अधिविभागात 'लेखक संवाद' या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. यावेळी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.



दीक्षित म्हणाल्या, दैनंदिन जीवनात मनामध्ये अनेक अतरंगी विचार येऊन जातात. त्यासाठी स्वतःशी संवाद साधावा लागतो. त्याच विचारांना आपण लेखनाच्या माध्यमातून व्यक्त करू शकतो. त्यातून एक आगळीवेगळी निर्मिती होऊ शकते. पण त्यासाठी रियाज महत्त्वाचा असतो. भोवतालाचे आवाज ऐकणे गरजेचे असते. हे करत असताना कोणतेही बंधन नको. लेखन अधिकाधिक सकस व समृद्ध होण्याकरिता जुन्या मराठी शब्दांची गरज व आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन असणे अत्यंत आवश्यक आहे.

यावेळी त्यांनी विद्यार्थ्यांचे शंकासमाधानही केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले. मराठी अधिविभागातील संशोधक विद्यार्थी, एम.ए.चे विद्यार्थी-विद्यार्थिनी कार्यक्रमाला उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2026

पुण्यनगरी

# आंतरविद्यापीठ कनोईंग, कयाकिंग स्पर्धा सांगलीत होणार

**कोल्हापूर** : भारतीय विद्यापीठ महासंघ (ए.आय.यू.) आणि शिवाजी विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने अखिल भारतीय आंतरविद्यापीठ कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या राष्ट्रीय स्तरावरील स्पर्धा रविवार, दि. ५ ते बुधवार, दि. ८ एप्रिल या कालावधीत सांगली येथील कृष्णा नदीपात्रात रंगणार आहेत. विशेष म्हणजे, अशा प्रकारची राष्ट्रीय स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच आयोजित केली जात असून, यामुळे शिवाजी विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला जाणार आहे, अशी माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी दिली. सांगली येथील 'कै. वसंतदादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदीघाट' येथील रॉयल बोट क्लब येथे या स्पर्धा पार पडतील. यामध्ये देशभरातील ४० विद्यापीठांतून ६८५ पुरुष व महिला खेळाडू सहभागी होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2026

सकाळ

# सांगलीत कृष्णाकाठी रविवारपासून रंगणार 'कनोईंग-कयाकिंग' स्पर्धा

**कोल्हापूर :** भारतीय विद्यापीठे महासंघ (एआययू) आणि शिवाजी विद्यापीठातर्फे अखिल भारतीय आंतर विद्यापीठ 'कनोईंग व कयाकिंग (पुरुष व महिला) स्पर्धा' सांगलीत रविवार (ता. ५) ते बुधवार (ता. ८) दरम्यान होणार आहे. कृष्णा नदीत रंगणाऱ्या या स्पर्धा महाराष्ट्रात प्रथमच होणार असल्याची माहिती प्रभारी कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी यांनी पत्रकार परिषदेत दिली. सांगली येथील वसंतदादा पाटील स्मृती स्मारक कृष्णा नदीघाट परिसरातील रॉयल बोट क्लब येथे होणाऱ्या या स्पर्धेत देशभरातील सुमारे ४० विद्यापीठांमधील तब्बल ६८५ खेळाडू सहभागी होणार आहेत. स्पर्धेचे उद्घाटन रविवारी सकाळी नऊ वाजता उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते, तर राज्यपाल कार्यालयाचे सचिव डॉ. प्रशांत नारनवरे यांच्या प्रमुख उपस्थितीत होईल. त्यापूर्वी सकाळी सात वाजता स्पर्धा सुरू होतील.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 APR 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठाच्या २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा सुरळित

जनप्रवास : कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या मार्च / एप्रिल - २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा १ एप्रिलपासून व्यवस्थितपणे सुरु झालेल्या आहेत. बुधवारी विविध २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १८१ परीक्षा केंद्रावर सुरळीतपणे पार पडल्या. या परीक्षांसाठी ३५०७८ विद्यार्थी उपस्थित होते. विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांच्यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. तसेच परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 APR 2026
तरूण भारत

# विद्यापीठाच्या परीक्षा सुरू

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या मार्च, एप्रिल– २०२६ उन्हाळी सत्रातील पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या परीक्षा बुधवार दि. ०१ रोजी पासून सुरु झालेल्या आहेत. बुधवारी विविध २५ अभ्यासक्रमांच्या परीक्षा वर्णनात्मक पध्दतीने १८१ परीक्षा केंद्रावर पार आहेत सदर परीक्षांसाठी ३५ हजार ०७८ विद्यार्थ्यांनी पहिल्या दिवशी परीक्षा दिली. परीक्षेसाठी विद्यापीठाने परीक्षेत गैरप्रकार करणाऱ्या विद्यार्थ्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथके स्थापन केली आहेत. परीक्षेचे पावित्र्य राखण्यासाठी विद्यार्थ्यांनी दिलेल्या सूचनाप्रमाणेच परीक्षा द्यावी, असे आवाहन संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांनी केले आहे.

0 2 APR 2026

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठाच्या एमबीए अभ्यासक्रम प्रवेशासाठी मुदतवाढ

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण व ऑनलाइन शिक्षण केंद्राअंतर्गत विद्यापीठ अनुदान आयोग व एआयसीटीई मान्यता प्राप्त ऑनलाइन एमबीए अभ्यासक्रमाची शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मधील जानेवारी-फेब्रुवारी २०२६ सत्रासाठी प्रवेश प्रक्रियेस दि. ३० एप्रिल २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी ऑनलाइन पद्धतीने अर्ज सादर करावेत, अशी माहिती संचालक डॉ. कृष्णा पाटील यांनी दिली.

विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या वतीने ऑनलाइन एमबीए अभ्यासक्रम गेल्या वर्षापासून सुरु आहे. हा अभ्यासक्रम प्रवेश, अध्ययन, परीक्षा व निकालापर्यंत असणारी सर्व शैक्षणिक प्रक्रिया ही ऑनलाइन स्वरुपाची असणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2026

क्रांतिसिंह

# डॉ.म.सु.पाटील वैश्विक दृष्टिकोन अंगीकारलेले समीक्षक

कोल्हापूर(प्रतिनिधी):- डॉ.म.सु.पाटील यांची समीक्षा व्रतस्थ आणि प्रमेयदर्शी आहे. त्यांनी निष्ठापूर्व व गांभीर्यपूर्वक समीक्षा लिहिली. प्रबंधात्मक ग्रंथ लिहिले. सुक्ष्म आणि नेटके वाचन करीत असताना आदि बंधात्मकनिष्ठ समिक्षेचा वापर केला. कलाकृतीकेंद्री समीक्षा करावी, असे त्यांचे म्हणणे होते. ते वैश्विक दृष्टिकोन



अंगीकारलेले समीक्षक होते, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ.दिलीप धोंगडे यांनी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या मानव्यशास्त्र सभागृहामध्ये मराठी अधिविभाग, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन व नव-अनुष्टुभ प्रतिष्ठान, येवला (नाशिक) यांच्या वतीने डॉ.म.सु.पाटील यांचा समीक्षा विचार या विषयावर एकदिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र आणि पुरस्कार वितरण समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते. डॉ.म.सु. पाटील यांच्या कन्या-मराठीतील प्रसिध्द लेखिका नीरजा यांची प्रमुख उपस्थिती होती.

पुढे बोलताना डॉ.धोंगडे म्हणाले,आदिबंधात्मक समीक्षा ही मानसशास्त्रातून आलेली आहे. डॉ.पाटील यांनी उपयोजन केले आणि आकलनाचा पैस विस्तीर्ण केला. यामुळे त्यांनी लेखकाभ्यासाला एक नवी प्रतिष्ठा मिळवून दिली. त्यांनी कर्तव्यबुध्दीने विपुल समीक्षा लिहून समीक्षेचा विस्तार मोठ्या प्रमाणात केला. त्यांना साहित्य अकादमीचे दोन पुरस्कार मिळाले आहेत. समीक्षेचा प्रदेश हा साकल्याचा आहे तो त्यांनी कधीही आखडू दिला नाही. ते कधीही कोणत्याही एका पंथाचे झालेले नाही. त्यांच्या आधारवाटातील लेखन विद्यार्थ्यांच्या आणि समीक्षकांच्या उपयोगी पडत आहे.सामप्रदायकतेचे व्रतधारण केल्याशिवाय ग्रंथांचे वाचन आणि आकलन करणे शक्य नाही. ज्ञानेश्वरीच्या आकराव्या अध्ययनामध्ये रसांची पंगत बसलेली आहे. ज्ञानेश्वरीचे उत्तम विवेचन त्यांनी केले आहे. श्रीमद्भगवद्गीतेचे आकलन त्यांना झालेले होते. तृष्णेचा खरा सिध्दांत त्यांना गीतेमध्ये सापडला. तृष्णाक्षयसुख त्यांनी अनुभवला आहे.त्यांनी समीक्षेची अनेक बलस्थाने मांडण्याचा प्रयत्न केला. मराठीमध्ये स्वतंत्र साहित्य शास्त्र असावे याचा आग्रह करणे योग्य नाही, तसे इंग्रजी मध्येही ते नाही. साहित्य ही एक वैश्विक गोष्ट आहे. जगभरातील गोष्टी एकत्र करून जे तयार होते ते साहित्यशास्त्र. वैश्विक साहित्यशास्त्राचे आदान -प्रदान होत रहात असते. एक छोटा समुह परिभाषिकतेचा वापर करून दुसऱ्या समुहाशी बोलत असतो.

अनुष्टुभ प्रतिष्ठान (येवला) डॉ.प्रविण बांदेकर मनोगतामध्ये म्हणाले, पाच दशकांपूर्वी अनुष्टुभच्या माध्यमातून वाङ्मयीन चळवळ सुरू झाली. मागील काही वर्षांमध्ये खेडयापाडयातील लिहित्या मंडळींना एक व्यासपीठ मिळवून दिले आहे. आपली परंपरा पुन्हा नव्याने पुढे आणण्याचा प्रयत्न होत आहे.

याप्रसंगी ज्येष्ठ लेखक डॉ.राजन गवस म्हणाले, डॉ.धोंगडे प्रशासनात असताना तुकारामांबाबत चिंतन करीत होते. डॉ.पाटील माणूस म्हणून उत्तुंग व्यक्तिमत्वाचे होते. त्यांची समीक्षा सहज, सोपी, सर्जनात्मक आहे.

अध्यक्षीय मनोगतामध्ये कुलसचिव डॉ.विलास शिंदे म्हणाले, ज्ञानेश्वरी, तुकाराम या साहित्यांकडे डॉ.म.सु.पाटील पहिल्यांदा गेलेले दिसतात. ते विवेकीय आणि विज्ञाननिष्ट दृष्टीकोन असलेले मातृहृदयी उत्तम समीक्षक होते. त्यांचे जीवन व कार्य या दोन्ही गोष्टींचा विद्यार्थ्यांनी साक्षेपाने अध्ययन करणे आवश्यक आहे.

तत्पूर्वी, डॉ.अशोक केळकर मराठी भाषा पुरस्कार मिळाल्या बद्दल मराठी अधिविभागाच्या वतीने प्राचार्य डॉ.दिलीप धोंगडे यांचा सत्कार डॉ.राजन गवस यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच, नव-अनुष्टुभ प्रतिष्ठानच्या दिवाळी अंकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते केले.

कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक डॉ.रणधीर शिंदे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय डॉ.नंदकुमार मोरे यांनी केला तर प्रांजली क्षीरसागर यांनी आभार मानेल. याप्रसंगी ज्येष्ठ लेखिका प्रतिभा कनेकर, वीरधवल परब उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
0 2 APR 2026
क्रांतिसिंह

# अंतर्गत सौंदर्य विवेकात प्रतिबिंबित असावे:डॉ.पंडित

कोल्हापूर(प्रतिनिधी) :- सौंदर्य ही केवळ बाह्य गोष्ट नसून, ती आपल्या विचारांमध्ये आणि विवेकातही प्रतिबिंबित व्हायला हवी. आपण जे पाहतो तेच सत्य असतेच असे नाही; नकाब आपल्याला या आभासी जगाचे भान करून देते, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. माया पंडित यांनी काल येथे केले. शिवाजी विद्यापीठाचे शरण साहित्य अध्यासन, अहिल्यादेवी होळकर अध्यासन, हिंदी अधिविभाग आणि विवेक वाहिनी यांच्या संयुक्त विद्यमाने आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या निमित्ताने ओंकार वर्णे लिखित व दिग्दर्शित 'नकाब' या एकांकिकेचे सादरीकरण आणि त्यावर मुक्तसंवाद अशा संयुक्त कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्यावेळी मार्गदर्शक म्हणून त्या बोलत होत्या. यावेळी विद्यापीठाचे जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर मार्गदर्शक म्हणून, तर वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेच्या अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी अध्यक्षस्थानी उपस्थित होत्या. नकाब या एकांकिकेच्या सादरीकरणाचे कौतुक करताना डॉ. पंडित म्हणाल्या, शारीरिक अभिव्यक्तीचे आकर्षण क्षणिक असते; पण विचारांची खोली आणि संवेदनशीलता माणसाला खऱ्या अर्थाने सुंदर बनवते, हे 'नकाब' खूप प्रत्ययकारकपणे दाखवते. माध्यमांनी निर्माण केलेल्या सौंदर्याच्या साच्यां मध्ये अडकून न राहता, स्वतःची ओळख शोधणे अधिक महत्त्वाचे आहे. सौंदर्यस्पर्धा आपल्याला एक प्रतिमा देतात; पण त्या प्रतिमेपलीकडील वास्तव समजून घेणे हीच खरी जाणीव आहे. तरुणाईने बाह्य आकर्षणाच्या मोहापेक्षा विवेक, मूल्ये आणि आत्मभान यांना प्राधान्य द्यायला हवे. शरीर आणि विचार यांचा समतोल साधला, तरच व्यक्तिमत्त्व परिपूर्ण बनते. महिलांची या वस्तुकरणातून सुटका करणे हीच आजघडीची आवश्यकता असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. उपलब्ध मंचीय व्यवस्थेमध्ये उत्तम




सादरीकरणाविषयी डॉ. आलोक जत्राटकर यांनी 'नकाब'च्या चमूचे अभिनंदन केले.ते म्हणाले, सौंदर्य प्रसाधनांच्या बाजारपेठेच्या विस्तारासाठी सौंदर्य स्पर्धा साह्यभूत ठरतात. सौंदर्य स्पर्धा या केवळ सांस्कृतिक कार्यक्रम नसून, त्या जागतिक भांडवलशाहीच्या बाजारपेठेचे प्रभावी साधन आहेत. सौंदर्य प्रसाधनांचा उद्योग हा अब्जावधींची उलाढाल करणारा बाजार आहे, जो आदर्श सौंदर्य संकल्पनेची विक्री करतो. भांडवलशाही व्यवस्थेत सौंदर्य ही नैसर्गिक गोष्ट न राहता 'उत्पादन' बनते आणि त्याची मागणी कृत्रिमरीत्या निर्माण केली जाते. भारतीय बाजारपेठेची प्रचंड व्याप्ती लक्षात घेता, जागतिक ब्रँड्ससाठी ती एक मोठी आर्थिक संधी ठरते. माध्यमे आणि जाहिराती सौंदर्याचे विशिष्ट मापदंड तयार करतात, ज्यामुळे ग्राहकांची मानसिकता आणि खरेदीची प्रवृत्ती घडवली जाते. सौंदर्याच्या नावाखाली असुरक्षिततेची भावना निर्माण करून बाजारपेठ स्वतःची वाढ सुनिश्चित करते. आपण सुंदर दिसण्यासाठी जे खर्च करतो, त्यामागे एक प्रचंड आर्थिक साखळी कार्यरत असते, हे लक्षात घेणे गरजेचे आहे. अध्यक्षीय मनोगतात अधिष्ठाता डॉ. वर्षा मैंदर्गी म्हणाल्या, महिला दिन हा केवळ उत्सव नसून, महिलांच्या आत्मसन्मान, समानता आणि स्वनिर्णयाच्या अधिकाराचा पुनरुच्चार आहे. सौंदर्याच्या संकल्पना बदलताना, महिलांनी स्वतःची ओळख आणि मूल्ये यांना केंद्रस्थानी ठेवणे, हेच खरे सक्षमीकरण आहे. सुरवातीला शरण साहित्य अध्यासनाच्या समन्वयक डॉ. तृप्ती करेकट्टी यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. जयसिंग कांबळे, प्रकाश निकम यांनी सूत्रसंचालन केले. चैत्रा राजाज्ञा यांनी आभार मानले. कार्यक्रमास सुरेश शिपूरकर, डॉ. अनमोल कोठडिया, डॉ. चैत्रा राजाज्ञा, डॉ. मच्छिंद्र गोफणे, सरला पाटील, भारती पोवार, सुरेखा आडके, विलास आंबोळे, सुभाष महाजन, चंद्रशेखर बटकडली, यश आंबोळे, स्वाती कृष्णात, रेश्मा खाडे, ॲड. अंकिता त्रिभुवने, शुभांगी चितारी, महानंदा पाटील आदी उपस्थित होते.

'नकाब' एकांकिकेविषयी... ओंकार वर्णे लिखित व दिग्दर्शित 'नकाब' या मालिकेच्या सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शारीर सौंदर्याच्या अशाश्वततेवर भाष्य करणाऱ्या या एकांकिकेत सौंदर्याच्या प्रचलित कृत्रिम संकल्पनांमध्ये अडकत जाऊन स्वतःचे अस्तित्व हरवून बसणाऱ्या एका तरुणीच्या स्वप्नांची ही कथा आहे. मानसी बोळुरे हिने ही मध्यवर्ती व्यक्तिरेखा खूप ताकदीने साकारली. तिच्याखेरीज यात ओंकारसह रमा घोलकर, साहिल बारस्कर, ऋतुराज पाटील, करण शेडगे, मयंक जैन आणि पवन यांनी अत्यंत चपखल भूमिका केल्या. प्रितेश पटेल यांचे पार्श्वसंगीत होते, तर पार्थ घोरपडे यांनी प्रकाशयोजना केली.

मुलगी शिकली; पण शिक्षणाचे उपयोजन काय?, महिला कमावत्या झाल्या; पण खर्चाचे स्वातंत्र्य आहे का?, समाजात सर्वत्र मुक्त संचार; पण सुरक्षित भवताल दिला का?, महिलांसाठीचे कठोर कायदे;पण सन्मानाची जन भावना निर्माण झाली का? आणि वैवाहिक स्थिरता; पण सहजीवनाचे काय? असे भ्रम आणि वास्तव पुरुषी मानसिकतेतून समाजात निर्माण झाले. महिलांच्या उदात्तीकरणाचे असे भ्रमाचे फुगे चिकित्सेच्या टाचणीने फोडून वास्तवातील स्त्री प्रश्नांची जाणीव करून घेण्याची प्रतिकात्मक कृती करीत अभिनव पद्धतीने या मुक्तसंवादाचे उद्घाटन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2026
क्रांतिसिंह

# दु.का.संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी



कोल्हापूर(प्रतिनिधी):-दु. का. संत हे संशोधन क्षेत्रातील ज्ञानतपस्वी होते, असे प्रतिपादन डॉ.अविनाश सांगोलेकर यांनी आज केले. शिवाजी विद्यापीठात मराठी अधिविभागातर्फे आयोजित डॉ. दु.का. संत व्याख्यानमाले अंतर्गत डॉ. दु. का. संत: जीवन आणि कार्य या विषयावर प्रमुख वक्ते म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलसचिव डॉ. विलास शिंदे होते.

सांगोलेकर म्हणाले, दु. का. संत हे ज्ञानाने भरलेले झाड असून त्यांचे सर्व लेखन मौलिक चिंतनातून आलेले आहे. संत हे व्रतस्थ संशोधक आणि समीक्षक होते. त्यांनी काळाच्या पुढचा विचार करून केलेले लेखन आजही दिशा दर्शक आहे. स्त्री मुक्ती संदर्भातील त्यांचे लेखन मौलिक स्वरूपाचे असून त्याला चिंतनाची जोड आहे.

मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे म्हणाले, दु. का. संत संशोधनातील पहिल्या पिढीचे अग्रदुत आहेत. संशोधन क्षेत्रातील त्याचे कार्य हे मूलभूत स्वरूपाचे असून त्यांच्या सर्व लेखनामधून आस्था, जिव्हाळा आणि शिस्तीचा प्रत्यय येतो. या व्याख्यानासाठी विशेष उपस्थित असणारे दु. का. संत यांचे चिरंजीव उदयप्रकाश संत यांनी संत यांच्या आठवणींना उजाळा दिला.

अध्यक्षीय मनोगतात कुलसचिव डॉ. विलास शिंदे म्हणाले, दु. का. संत यांचे लेखन आजच्या संशोधक विद्यार्थ्यांना मार्गदर्शक आहे. तसेच, काळाच्या पुढचा विचार करून लिहिणारा लेखक दुर्लक्षित राहिला याची खंत आहे. त्यांच्या संशोधनाचा, लेखनाचा आणि विचाराचा वारसा पुढे नेण्यासाठीच ही व्याख्यानमाला आहे.

प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले, तर डॉ. सुखदेव एकल यांनी आभार मानले. या कार्यक्रमासाठी डॉ. नीता संत, अमृता पाटील, शाल्मली संत,अभिजीत पाटील, डॉ. अनिल उबाळे, प्रा. पी. आर. गावडे यांच्यासह मराठी विभागातील संशोधक, विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
02 APR 2026

कॉलिरिंड

# विद्यापीठातर्फे यशवंतराव चव्हाण यांना आदरांजली

कोल्हापूर(प्रतिनिधी):- महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवाजी विद्यापीठाच्या यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंट येथे यशवंतराव चव्हाण अध्यासनातर्फे त्यांना आदरांजली वाहण्यात आली. कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते यशवंतराव चव्हाण यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी यशवंतराव चव्हाण स्कूल ऑफ रुरल डेव्हलपमेंटचे संचालक डॉ. नितीन माळी, अध्यासनाचे समन्वयक डॉ. गजानन साळुंखे, डॉ. सुधीर देसाई, डॉ. अमोल मिणचेकर, डॉ. वैशाली भोसले, डॉ. कविता वड्राळे, डॉ. संतोष सुतार, चेतन गळगे आदींसह विद्यार्थी-विद्यार्थिनी उपस्थित होते.